अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 24 जुलै 2025 | वर्ष 10 वे | अंक 51 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# ने.हि. कन्या विद्यालयात ईव्हीएम मशीन ॲपद्वारे शालेय निवडणूक

## तब्बल १५०६ विद्यार्थीनींचे ॲपद्वारे मतदान, मंत्रीमंडळ स्थापना व शपथविधी सोहळा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

आजचे बालक हे उद्याचे भावी नागरिक व देशाचे आधारस्तंभ. त्यांच्यामध्ये लोकशाही रुजावी व लोकशाहीचे मूल्य विद्यार्थिनींनी आत्मसात करावे, या दृष्टीने दिनांक २१ जुलै २०२५ ला शालेय निवडणुकीचे आयोजन येथील नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालयात करण्यात आले.







यावर्षी शालेय निवडणूक डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून ईव्हीएम वोटिंग मशीन ॲपद्वारे घेण्यात आली. निवडणूक प्रक्रिया व्यवस्थितपणे पार पडावी यासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यानुसार दिनांक १७ जुलैला विद्यार्थिनींनी शालेय मैदानात प्रचार केला व दिनांक १८ जुलैला उमेदवारांची प्रचार सभा आयोजित करण्यात आली. १९ जुलै ला प्रत्यक्ष निवडणूक पार पडली. विद्यार्थीनींना मतदान करण्यासाठी एकूण सहा बूथ तयार करण्यात आले. सर्व बूथ वरील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. सोबतच विद्यार्थिनींनी मतदान अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळला. विद्यार्थिनींना निवडणूक प्रक्रिया कळावी, यासाठी निवडणूक सुरू होण्याआधी मॉक पोल घेऊन प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात करण्यात आली. सर्व विद्यार्थिनींच्या समोर मतमोजणी करून विजयी उमेदवार घोषित करण्यात आले.

यामध्ये मिडल स्कूल विभाग शाळा नायिका म्हणून कु. अदिती विनोद जनबंधू वर्ग ७ वा ड, शाळा उपनायिका कु. मल्हणी नंदकिशोर तुपटे वर्ग ६ वा ब, हायस्कूल विभाग शाळा नायिका कु.अंशुल मनोज कुमार जुनघरे वर्ग १० वा क, शाळा उपनयिका कु. हिमानी देवानंद बावनकुळे वर्ग ९ वा अ प्रचंड बहुमताने विजयी झाले. दिनांक २१ जुलै २०२५ ला विजयी उमेदवारांचे पुष्पगुच्छ, head girl slash, मुकुट, बॅच

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# मामाचा १४ वर्षीय भाचीवर अत्याचार

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना काही थांबण्याचं नावच घेत नाहीत. महिला आणि मुलींवरील अत्याचाराच्या घटना समोर येत आहेत. ब्रम्हपुरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका अल्पवयीन भाचीवर आत्येमामाने अनेक वेळा अत्याचार केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली. पवित्र नात्याला काळीमा फासणाऱ्या मामा विरूद्ध ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.



ब्रम्हपुरी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ब्रम्हपुरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत फिर्यादीसह तिच्या दोन मूली वास्तव्यास आहेत. आरोपी सुमित गणेश मेश्राम वय २९ वर्षीय राह. नान्होरी, तह. ब्रम्हपुरी मामाची (चुलत आत्याचा नवरा )अल्पवयीन भाचीवर नजर पडली. त्याने कुठल्याही नात्यागोत्याचा विचार न करता, अल्पवयीन १४ वर्षीय भाचीला जाळ्यात ओढून तिचे लैंगिक शोषण केले. दि. १२/०६/२०२५ ते १९/०६/२०२५ दरम्यान ब्रम्हपुरी परिसरातील चांदगाव रोडजवळील नहर, मेंडकी-मालडोंगरी रोड आदी ठिकाणी नेऊन तिचे लैंगिक शोषन केले. आरोपी सुमित गणेश मेश्राम याने अल्पवयीन भाचीवर वारंवार बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याच्या तक्रारीवरून ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात दि. १९ जुलै २०२५ला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी ब्रम्हपुरी पोलिसांनी आरोपी सुमित गणेश मेश्राम याच्या विरूद्ध ब्रम्हपुरी

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# नोकरीचे आमिष देऊन आर्थिक फसवणूक करणाऱ्या 'बबली'ला अटक

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात फसवणूकीचे प्रमाण वाढत असून, त्यात बेरोजगार फसवणूकीला बळी पडत आहेत. नौकरी लावून देण्याचे अमिष दाखवून बंटी बबलीच्या जोडीने लाखांदूर व ब्रम्हपुरी तालुक्यात बेरोजगार तरूणांची फसवणूक केली होती. ब्रम्हपुरी शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या मालडोंगरी गावातील बेरोजगारांची नौकरी लावून देण्याच्या बहाण्याने बबलीने १०.५ लाखांनी आर्थिक फसवणूक केली होती. याप्रकरणी ब्रम्हपुरी पोलिसांनी आपली तपासचक्रे फिरवित बबली ला नुकतीच अटक केली आहे.

सौरभ प्रफुल पारधी वय २२ राह. मालडोंगरी असे फिर्यादीचे नाव आहे. फिर्यादी सौरभ हा शहरातील विदर्भइस्टेट कॉलनी ३ मधील आरोपी रोषनी रोमल नाकतोडे वय २९ वर्षे हिच्या घरी सन २०२२ पासून दूधाची विक्री करायचा. त्यामुळे फिर्यादाची रोषनी सोबत चांगली ओळख होती. आरोपी रोषनी नाकतोडे हिने फिर्यादी व त्याचे मित्रास आरोग्य विभागामध्ये नोकरी लावून देतो असे आमिष दाखवून विश्वासात घेऊन फिर्यादी सौरभ कडून ५,९९,७००/- रुपये व फिर्यादीचे मित्राकडून ४,५१,३००/- रुपये वेळोवेळी आरटीजीएस तसेच रोख व गुगल पे द्वारे स्वीकारून नोकरी न लावून देता विश्वासघात करून एकूण रुपये १०,५१,३००/- रुपये ची आर्थिक फसवणूक केली. याप्रकरणी ब्रम्हपुरी पोलिसांनी आरोपी रोषनी रोमल नाकतोडे हिच्या विरूद्ध ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक शितल खोब्रागडे ह्या करीत होत्या. त्यांनी आपली तपासचक्रे फिरविली असता, आरोपी रोषनी रोमल

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# ओहोटीची लाज नाही!

लोकशाही म्हणजे काय, अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची केलेली व्याख्या कोणती, वगैरे नागरिक शात्रातील प्रश्न खरे तर नव्या अभ्यासक्रमातून काढूनच टाकायला हवेत. महाराष्ट्र विधानभवनाच्या आवारात गेला आठवडाभर भाजपचे गोपीचंद पडळकर विरुद्ध राष्ट्रवादी (शप) चे जितेंद्र आव्हाड यांच्यातील शाब्दिक चकमक जनतेला 'याची देही याची डोळा' पाहण्याचे सौभाग्य डिजिटल व वाहिन्यांच्या प्रतिनिधींमुळे मिळाले, ते कमी की काय, म्हणून गुरुवारी संध्याकाळी या दोन्ही आमदारांच्या समर्थकांनी हिंदी सिनेमात शोभेल अशी जी तुफान हाणामारी केली, ते पाहून जनतेच्या डोळ्यांचे पारणे फिटले असेल. जनता मतदान करून यांना विधिमंडळात कशासाठी पाठवते व ते तेथे नक्की करतात काय, हे प्रश्न यामुळे ऐरणीवर आले आहेत.

खरे तर हे सगळे घडण्यामागील कारण सांगणे म्हणजे शब्द वाया घालवण्यासारखेच. तरीही वाहिन्या वा रील्स न पाहिलेल्या काही सुज्ञ वाचकांसाठी घटनाक्रम थोडक्यात सांगणे भाग आहे. गोपीचंद पडळकर हे त्यांच्या वादग्रस्त बोलण्यासाठी ओळखले जातात. त्यांनी अलीकडेच कुठल्याशा सभेतील भाषणात सुप्रिया सुळे यांचे नाव न घेता त्यांच्यावर व एकूणच पवार कुटुंबीयांवर अत्यंत हीन दर्जाची टीका केली. शरद पवार यांच्या मागेपुढे करत राजकीय यशाच्या पायऱ्या चढलेले जितेंद्र आव्हाड यांना पवार कुटुंबावरील निष्ठा दाखविण्याची आयती संधीच त्यामुळे मिळाली. त्यांनी विधानभवनाच्या आवारातच पडळकर येत असताना समाजमाध्यमांवर त्यांना ट्रोल केले जाते तशाच घोषणा देत डिवचले. दुसऱ्याच दिवशी विधानभवनाबाहेर पडळकर यांच्या गाडीसमोर आव्हाड व पडकर आणि त्यांचे समर्थक यांच्यात अश्लील भाषेत संवाद झाला. त्या वेळी दोघांचेही जे समर्थक उपस्थित होते, त्यांच्यात गुरुवारी विधानभवनाच्या प्रवेशद्वारापाशी मोकळ्या जागेत 'राडा' झाला. दोघांच्याही समर्थकांना पकडल्यानंतर आव्हाड यांनी समर्थकांना सोडावे म्हणून पहाटे तीन वाजेपर्यंत पोलिसांचीच गाडी अडवून धरली व स्वत:ला फरफटत बाजूला नेण्याची वेळ पोलिसांवर आणली.

जगभरातील संसदीय लोकशाही असलेल्या देशांमधील लोकप्रतिनिधी हे सर्वसामान्य जनतेपर्यंत स्वत:ची भूमिका पोहोचावी यासाठी दृश्य परिणामांचा विचार करूनच वागतात. त्यात वावगे काहीच नाही.

ब्रिटनच्या संसदेत अधिवेशन सुरू होण्यापूर्वी आणल्या जाणाऱ्या राजदंडाची हाऊस ऑफ कॉमन्सचे सदस्य खासदार डेनिस स्कीनर हे यथेच्छ टवाळी करीत. राजेशाहीच्या उरल्या-सुरल्या खुणा लोकशाहीत संपून जाव्यात, या भूमिकेतून ती टवाळी असे. मात्र, गेल्या आठवडाभरात महाराष्ट्राच्या विधानसभेत जे झाले ते अशा कोणत्याही सकारात्मक गोष्टींसाठी नव्हते. संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील उपाहारगृहाच्या व्यवस्थापकास, कर्मचाऱ्यास बॉक्सिंगमधील आपले कौशल्य दाखवणे असो, वा पडळकर आणि आव्हाड यांच्यात फाटकाबाहेर झालेला संवाद असो, की त्यांच्या समर्थकांमधील एखाद्या माफिया गँगच्या सदस्यांप्रमाणे झालेली हाणामारी असो, यातून या लोकप्रतिनिधींना जनतेला नक्की कोणता संदेश द्यायचा आहे? या अधिवेशनात जनतेच्या कोणत्या मूलभूत प्रश्नांवर सरकारला अडचणीत आणण्यासाठी वा मंत्र्यांना कोंडीत पकडण्यासाठी संसदीय आयुधांचा वापर विरोधकांनी केला? विधानभवनाच्या पायऱ्यांवर बसून एखाद्या नाक्यावरील टवाळ तरुणांप्रमाणे येणाऱ्या-जाणाऱ्या सत्ताधारी आमदार व मंत्र्यांवर शेलकी-शेरेबाजी करण्यातून विरोधकांनी नक्की काय साधले?

# ने.हि. विद्यालयात अद्ययावत संगणक कक्षाचे उद्घाटन

ब्रम्हपुरी/का.प्र.

आजच्या तांत्रिक शिक्षणाच्या युगात विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षर बनविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत नेवजाबाई हितकारिणी माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरी येथे अद्ययावत संगणक कक्षाचे उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. दिनांक २१ जुलै २०२५ रोजी, सोमवारला ६० विद्यार्थ्यांच्या आसन क्षमतेचा सुसज्ज संगणक कक्ष शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी खुला करण्यात आला. उद्घाटन सोहळ्याला उद्घाटक म्हणून संस्थेचे सचिव





अशोकजी भैया साहेब उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापक के.एम. नाईक सर व पर्यवेक्षक प्रा. पी.आर. जिभकाटे सर यांची उपस्थिती होती.

यावेळी अशोकजी भैया यांनी आपल्या उद्घाटनीय भाषणात विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणाचे महत्त्व पटवून देत, 'युग बदलले आहे, आता संगणकीय ज्ञानाशिवाय प्रगती शक्य नाही. या अद्ययावत संगणक कक्षाचा प्रत्येक विद्यार्थ्याने लाभ घ्यावा,' असे उद्गार काढले. कार्यक्रमावेळी इयत्ता ८ वी ड चे सर्व विद्यार्थी मोठ्या उत्साहात उपस्थित होते. प्रसंगी कानझोडे सर, पराते सर, वदनलवार सर, गायकवाड सर, करंबे सर आणि कलकोटवार मॅडम यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वदनलवार सर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. जिभकाटे सर यांनी केले. सदर उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद आणि विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. हा संगणक कक्ष केवळ एक सुविधा न राहता विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा एक मजबूत पाया ठरेल, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# गावठी कट्टा व काडतूसासह दोघांना अटक

ब्रम्हपुरी/का.प्र.

चंद्रपुर येथील गुन्हे शाखेचे पथक ब्रम्हपुरी येथे अवैध व्यवसायाविरुध्द कारवाई करीता पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदारांकडून मिळालेल्या बातमीवरुन ब्रम्हपुरी तालुक्यातील किन्ही गावात एका संशयीतांचे घरी पंचासमक्ष धाड टाकली असता एका इसमाजवळ एका गावठी कट्ट्यासह काडतूस आढळून आले. यावरून पोलिसांनी गणेश उर्फ गोलू बक्षी सोनवणे (२६) रा. किन्ही ता. ब्रम्हपुरी याला अटक केल्याची कारवाई दि. १९ जुलैला करण्यात आली.

सदर आरोपीने देशी कट्टा व काडतूस हे अक्षय भजनदास शेंडे रा. मालडोंगरी ता. ब्रम्हपुरी याने दिल्याचे सांगितले. या घटनेतील दोन्ही आरोपींना ताब्यात घेवुन पंचनामा कारवाई करुन त्यांच्या विरुध्द भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३, २५ अन्वये गुन्हा नोंद करुन पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथे अटक करण्यात आली.

सदरची कारवाई मुम्मका सुदर्शन, पोलीस अधीक्षक चंद्रपूर, ईश्वर कातकडे, अपर पोलीस अधीक्षक मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा चंद्रपूरचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचे नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक बलराम झाडोकार, पोलीस उपनिरीक्षक संतोष निंभोरकर, पोहवा सचिन गुरनुले, पोअं गणेश भोयर यांनी केली आहे.

# संशोधक विद्यार्थ्यांनी निरंतर परिश्रम घेणे गरजेचे - प्राचार्य डॉ. शेकोकर

### ने.हि. महाविद्यालयातील मराठी संशोधन केंद्राचा उपक्रम



ब्रह्मपुरी/का.प्र.

'समाजाला काहीतरी नवं हव असते, त्यामुळे संशोधन करतांना संशोधक विद्यार्थ्याने निरंतर परिश्रम घेवून आपले संशोधन कार्य वेळेच्या आत पूर्ण करावयाचे असते', असे बहूमूल्य विवेचन कार्य. प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकरांनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात मराठी संशोधन केंद्रातर्फे आयोजित आचार्य पदवी विद्यार्थ्यांच्या सहामाही प्रगती अहवाल कार्यक्रमात बोलत होते.

विचारपीठावर मराठी विभाग व संशोधन केंद्र प्रमुख कवी डॉ. धनराज खानोरकर, विशेष विषय तज्ज्ञ डॉ. जगदिश मेश्राम, संशोधन विभाग प्रभारी डॉ. योगेश ठावरी, डॉ. प्रकाश वट्टी, डॉ. पद्माकर वानखडे उपस्थित होते. यावेळी मराठी विभागातील १८ संशोधक विद्यार्थ्यांनी आपला सहामाही प्रगती अहवाल सचित्र सादर केला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. वानखडे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. वट्टीनी केले.

## विनोदिनी

*रिक्षावाला - बोला साहेब... कुठे जाणार ?*
*गंपू - नवी मुंबईला...*
*रिक्षावाला- पण साहेब , कोणत्या क्लासने जायचं ते सांगा...*
*गंपू - आं...रेल्वेतला... , विमानातला क्लास माहितीय. पण रिक्षात क्लास म्हणजे काय..?*
*रिक्षावाला - फर्स्ट क्लासमध्ये म्युझिक चालू आणि खड्डे चुकवून रिक्षा चालवणार. सेकंड क्लासमध्ये म्युझिक बंद आणि फक्त खड्ड्यातून रिक्षा चालवणार...*
*गंपू - अन् थर्ड क्लास ?*
*रिक्षावाला - थर्ड क्लासमध्ये मी मागे बसणार आणि तुम्ही रिक्षा चालवायची...!*

# वैद्यकीय उपचारानंतरही त्या वानराचा मृत्यू

ब्रह्मपुरी/का.प्र.

एका झाडावरून दुसऱ्या झाडावर ऊडी घेतांना खाली जमिनीवर पडल्याने एका वानराचा अपघात घडला. त्याला त्वरित वैद्यकीय उपचाराची गरज होती. अशाच सेवाभावी वृत्तीने एका पशुवैद्यकीय डॉक्टरांनी वानरावर वेळीच योग्य उपचार करून वानराचा जीव वाचवण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचे ते प्रयत्न अयशस्वी ठरले. ही घटना गुरुवार दिनांक १७ जुलै रोजी किन्ही गावातील नरेश आंबोने यांच्या घराशेजारी घडली.

नेहमीप्रमाणे वानराची टोळी एका झाडावरून दुसऱ्या झाडावर खेळण्यात मग्न होती. त्यातच टोळीतील एका वानराचा एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडी घेतांना फांदी तुटल्याने तोल गेला. त्यामुळे तो खाली पडल्याने अपघात झाला. त्याला गंभीर स्वरूपाची जखम झाली. ही बाब शुभम आंबोने यांच्या लक्षात येताच त्यांनी त्याला पाणी पाजून शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर चौगान येथील पशु वैद्यकीय डॉक्टर शैलेश लिंगायत यांना घटने संदर्भात माहिती दिली. वेळीच शैलेश लिंगायत यांनी येऊन वानरावर वैद्यकीय उपचार केले. बेशुद्ध अवस्थेत असलेले वानर काही वेळासाठी शुद्धीवर आले. मात्र काही तासानंतर त्या वानराचा अखेर मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच ब्रह्मपुरी उत्तर वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन नरड, क्षेत्र सहाय्यक सय्यद, यांच्या सूचनेनुसार वनरक्षक पी.एम. चुन्ने यांच्यासह वन विभागाच्या चमुने घटनास्थळ गाठत पंचनामा केला.

# महिलेचा विनयभंग करणाऱ्या दोन आरोपींना अटक

ब्रह्मपुरी/का.प्र.

सार्वजनिक ठिकाणावरून जात असलेल्या महिलेला अडवून तिच्याशी अश्लील भाषेत गैरवर्तणूक करून तिचा विनयभंग करणाऱ्या दोन आरोपींना ब्रह्मपुरी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत बेड्या घातल्या आहेत. दोन्ही आरोपींविरुद्ध तीन दिवसात प्रथम श्रेणी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

ब्रह्मपुरी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला ही ब्रम्हपुरीची रहिवासी आहे. फिर्यादी महिला व तिचा पती सार्वजनिक रस्त्यावरून मोटार सायकलने जात असताना, आरोपी आशिक दिलदार माटे वय ३२ वर्षे व स्वप्नील उर्फ प्रशांत सखाराम नागदेवते वय ३१ वर्षे दोन्ही रा.उदापूर ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपुर यांनी संगणमत करून त्यांच्या मोटार सायकलला थांबविले. आरोपी आशिक माटे याने फिर्यादीस तुझ्या भावाने स्वप्नील नागदेवतेचे बोट मोडले असे म्हणून, फिर्यादी महिले सोबत भांडण केले, व फिर्यादी महिलेचे उजव्या हाताचे मधल्या बोटाला चावा घेतला.

दोन्ही आरोपींनी फिर्यादी महिलेस व तिच्या पतीस हाताबुक्यांनी मारहाण केली व फिर्यादी महिलेस अश्लील व अर्वाच्च भाषेत बोलले. आरोपींनी फिर्यादी महिलेचे डोक्याचे केस पकडले, आणि फिर्यादी महिलेस खेचत नेऊन कचऱ्याच्या ढिगाऱ्यात ढकलून दिले. व विकृत मानसिकतेच्या आरोपींनी अश्लील वर्तणूक केली. त्यामुळे फिर्यादी महिलेच्या मनात आरोपींच्या कृत्यांविषयी भीती निर्माण झाली. यातील आरोपी आशिक माटे ने फिर्यादी महिलेचा गळा दाबल्याने तिचे मंगळसुत्र तुटले. फिर्यादी महिलेला दोघांनीही जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत फिर्यादी महिलेने झालेल्या घटनाक्रमाबद्दल ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. दिलेल्या तक्रारीवरून ब्रह्मपुरी पोलिसांनी कलम ७४, ७५(१)(२), १२६(२), २९६, ११५(२), ३५१(३), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये दि. ११/०७/२०२५ ला गुन्हा दाखल केला.

ब्रह्मपुरी पोलिसांनी सदर तपास करीत गुन्ह्यातील आरोपी आशिक दिलदार माटे वय ३२ वर्षे व स्वप्नील उर्फ प्रशांत सखाराम नागदेवते वय ३१ वर्षे दोन्ही रा.उदापुर ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर यांना तात्काळ अटक करून न्यायालयात हजर केले. पोलिसांनी आरोपी विरूद्ध प्रतिबंधक कारवाई करून तात्काळ वरिष्ठांचे आदेशान्वये दोषारोपपत्र तयार करून प्रथम श्रेणी न्यायालय ब्रम्हपूरी येथे दाखल केले असता, केवळ तीन दिवसात दिनांक १४/०७/२०२५ रोजी दोषारोपपत्र दाखल झाला. सदर गुन्ह्यात पोलिसांनी तीन दिवसात तपास करून दोषारोपपत्र न्यायालयांत दाखल केले आहे.

गुन्ह्याचा तपास चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन (भा. पो. से.), ईश्वर कातकडे अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रपुर, उपविभागीय पोलीस अधिकारी ब्रम्हपुरी यांचे मार्गदर्शनाखाली व प्रमोद बानवले, पोलीस निरीक्षक पो.स्टे. ब्रम्हपुरी यांचे देखरेख व नियंत्रणाखाली ब्रम्हपुरी पोलीस स्टेशन येथील सपोनि शितल खोब्रागडे, पोलीस अंमलदार परमेश्वर नागरगोचे, पोलिस अंमलदार धनराज शिवणकर यांनी केला आहे.

# भरमार बंदूक, दारूगोळा व मृत वन्यप्राण्यांसह दोघे जेरबंद

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी-आरमोरी मार्गावरील रेल्वे क्रॉसिंगजवळ स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून केलेल्या कारवाईत भरमार बंदूक, दारूगोळा, मोपेड गाडीसह तीन मृत जंगली डुकरांसह दोघांना १८ जुलै रोजी अटक करण्यात आली. या कारवाईमुळे वन्यप्राणी शिकार आणि बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या टोळक्याचा पर्दाफाश झाला आहे.

कुंदनसिंग शेरसिंग भुराणी (३१), विजयसिंग सुरतसिंग भुराणी (२१), दोघेही रा. पेठवॉर्ड, ब्रह्मपुरी असे अटकेतील आरोपींचे नावे आहे. १८ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ब्रह्मपुरी-आरमोरी मार्गावर सापळा रचला. दरम्यान, मोपेड गाडीवर संशयितरीत्या फिरत असलेल्या मोपेड वाहनाला थांबवून तपासणी केली. यावेळी भरमार बंदूक, जिवंत दारूगोळा, वन्यप्राणी सरंक्षण अधिनियमाअंतर्गत संरक्षित असलेले तीन मृत जंगली डुक्कर आढळून आले. पोलिसांनी सर्व मुद्देमाल जप्त करून वन्यप्राणी सरंक्षण अधिनियम व शस्त्र अधिनियमअंतर्गत गुन्हा दाखल करून दोघांना बेड्या ठोकल्या.

ही कारवाई चंद्रपुर गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक बलराम झाडोकार, पोलिस उपनिरीक्षक संतोष निंभोरकर, पोलिस अंमलदार गणेश भोयर, अजित शेंडे, नितेश महात्मे, प्रदीप मडावी यांच्या पथकाने केली.

# जनसुरक्षा विधेयक मागे घ्या - वंचित बहु. आघाडीची मागणी



ब्रह्मपुरी/का.प्र.

राज्यातील जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर तसेच भारतीय राज्यघटनेची पायमल्ली करणारे शिवाय माणुसकीची हत्या करणारे विशेष जनसुरक्षा विधेयक भाजप महायुती सरकारने नुकतेच विधिमंडळात बहुमताच्या जोरावर मंजूर करून घेतले. ते सामान्य जनतेवर लादले. ते विधेयक नागरिकांच्या हक्कावर गदा आणणारे आहे. त्यामुळे विधेयक तत्काळ रद्द करावे, अशी मागणीचे निवेदन वंचित बहुजन आघाडीने उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील यांना दिले.

तालुकाध्यक्ष लिलाधर वंजारी यांच्या नेतृत्वात वंचित बहुजन आघाडी तालुकाच्या वतीने उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी यांच्या मार्फत शासनाला निवेदन देऊन हा काळा कायदा मागे घेऊन रद्द करा, अशी मागणी करण्यात आली. ही मागणी पूर्ण न झाल्यास वंचित बहुजन आघाडीकडून तीव्र स्वरुपाचे आंदोलन करू, असा इशारा यावेळी प्रशासनाला देण्यात आला.

यावेळी डॉ. प्रेमलाल मेश्राम, जिल्हा उपाध्यक्षा महिला आघाडी लिना रामटेके, तालुका महासचिव नरेंद्र मेश्राम, डी. एम. रामटेके, भीम आर्मी तालुका प्रमुख प्रभु लोखंडे, युवा अध्यक्ष रतन लांडगे, सुकेशिनी बन्सोड, अनिल कांबळे, मिलिंद घोरमोडे, किरण मेश्राम, प्रतिभा डांगे, लता मेश्राम, निरु खोब्रागडे, जगदिश भशाखेत्रे, एस. के. टेंभुर्णे, सुजाता मेश्राम, विश्वनाथ खोब्रागडे उपस्थित होते.

# शिवभोजनात चक्क कणीचा भात

## पुरवठा निरिक्षक कांबळे यांनी ठोठावला दंड

ब्रह्मपुरी/का.प्र.

शिवभोजन केंद्र, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जेवणासाठी गेलेल्या विवेक चहांदे यांना त्यांच्या ताटात लाल-पिवळसर रंगाचा कण्याचा भात आढळल्याने ते अचंबित झाले. खवचटपणे रंग मिसळलेला हा भात पाहून त्यांना गैरसोयीची जाणीव झाली आणि त्यांनी हा गंभीर प्रकार तात्काळ ब्रह्मपुरी येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल भोयर यांना फोनवरून कळवला. या घटनेची माहिती मिळताच पत्रकार राहुल भोयर यांनी समाजहिताची भूमिका घेत संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकारी अमित कांबळे यांच्याशी संपर्क साधला. राहुल भोयर यांच्या सूचनेची गांभीर्याने दखल घेत अमित कांबळे यांनी शिवभोजन केंद्रावर भेट देत पाहणी करून दोषी आढळलेल्या केंद्र चालक मोहबे यांच्यावर ५,००० रुपयांचा दंड ठोठावला.

या घटनेत आणखी एक गंभीर बाजू अशी समोर आली की, जेव्हा विवेक चहांदे यांनी जेवणातील दोष निदर्शनास आणला, त्याच वेळी केंद्र चालकाने त्यांना पोलिसात तक्रार दिल्यास परिणाम भोगावे लागतील, अशा स्वरूपाची धमकी दिली होती. मात्र विवेक चहांदे यांनी सजग नागरिक म्हणून आपली जबाबदारी पार पाडली.

पुरवठा निरिक्षक अमित कांबळे यांच्या कारवाईमुळे शिवभोजन केंद्र चालवणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# वृक्षलागवड घोटाळ्याची चौकशी करून दोषींवर कारवाई करा

## आमदार वडेट्टीवारांचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निर्देश



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील सामुहिक वनहक्क समिती द्वारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वृक्ष लागवड व संगोपन यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात आला असुन सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे असे निर्देश महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस गटनेते तथा आमदार विजय वडेट्टीवार यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले.

ब्रम्हपूरी तालुक्यातील सामुहिक वनहक्क समित्यांच्या अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष यांची स्वाक्षरी झालेले कोरे धनादेश घेवून सामुहिक वनहक्क समीतीला अंधारात ठेवून सदर समीत्यांची मार्गदर्शक संस्था असलेल्या राधा ऑर्गनाईजेशन संस्थेने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केलेला आहे. यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत तहसील कार्यालय व पंचायत समिती येथील संबंधित यंत्रणेमार्फत बोगस मस्टर तयार करून कोणत्याही प्रकारची वृक्ष लागवड न करता परस्पर पैशाची उचल केलेली आहे. सोबतच खते, किटकनाशके फवारणी न करता, झाडांना पाणी न देता व इतर कामे न करता त्याची देयके मंजूर करण्याचा प्रकार झालेला असुन ही बाब गंभीर स्वरूपाची आहे. त्यामुळे या संदर्भात चोरटी, वायगाव, चांदगाव, धामणगाव व इतर गावांतील ग्रामस्थांनी विधीमंडळ काँग्रेस गटनेते तथा आमदार विजय वडेट्टीवार यांची भेट घेऊन सदर बाबतीत निवेदन सादर केले. त्यानंतर सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आ.विजय वडेट्टीवार यांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना दि. २२ जूलै रोजी सकाळी तात्काळ बैठकीसाठी बोलविले. बैठकीदरम्यान सामुहिक वनहक्क समित्यांमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश यावेळी आम. विजय वडेट्टीवार यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी बैठकीला उपविभागीय अधिकारी पर्वनी पाटील, तहसीलदार सतीश मासाळ, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, चोरटी येथील मोरेश्वर ऊईके, राजेश खरकाटे, अविनाश रामटेके, कालेश्वर रामटेके, सोमेश्वर राऊत, सुरेश मडावी, चांदगाव येथील रामकृष्ण राऊत, वायगाव येथील मुखरू श्रीरामे, उद्धव डुंबरे, धामणगाव नागरिकांसह अन्य उपस्थित होते.

## वाढती लोकसंख्या देशाकरीता चिंतादायक - डॉ. मोहन कापगते

ब्रम्हपुरी/का.प्र.

'वाढती लोकसंख्या देशाच्या विकासासाठी मारक असून, भारताला महासत्ता म्हणून



जगासमोर जाण्यास अडसर ठरू शकते. एकविसाव्या शतकात पदार्पण करूनही आपल्या देशातील लाखो सर्वसामान्य जनतेचे अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पूर्ण होऊ शकल्या नाहीत. 'हम दो हमारा एक' हा नारा आता द्यावा लागेल तेव्हाच वाढत्या लोकसंख्येला आळा बसेल,' असे विचार डॉ. मोहन कापगते यांनी व्यक्त केले, ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

लोकसंख्या शिक्षण मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना या विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक लोकसंख्या दिनाच्या कार्यक्रमात व्यासपीठावर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकर, प्रमुख अतिथी कलाशाखा प्रमुख डॉ. राजेंद्रकुमार डांगे, रासेयो प्रमुख डॉ. प्रकाश वट्टी तर लोकसंख्या शिक्षण मंडळाचे प्रमुख डॉ. पद्माकर वानखडे उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. राजेंद्र डांगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकर यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. पद्माकर वानखडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. बंडू गेडाम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. धनराज खानोरकर, डॉ. भास्कर लेनगुरे, डॉ. अजित खाजगीवाले, डॉ. मिलिंद पठाडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला बहुसंख्य प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना आम. भांगडियांच्या हस्ते बक्षीस वितरण



नागभीड/प्रतिनिधी

आमदार बंटी उर्फ कीर्तिकुमार भांगडिया यांच्या वाढदिवसानिमित्त लोटस डायनॅमीक्स युथ फाउंडेशन तर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण दिनांक १९ जुलै रोजी आम. भांगडिया यांचे शुभहस्ते गणेश मंगल कार्यालयात नागभीड येथे पार पडले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह पालक व शिक्षकांचा भरभरून प्रतिसाद लाभला.

चित्रकला स्पर्धा चौथी ते सातवी आणि ८ वी ते १० वी अशा दोन विभागांमध्ये विभागली गेली होती. विद्यार्थ्यांनी ऑपरेशन सिंदूर, एक पेड माँ के नाम, शिवकालीन किल्ले या विषयांवर आकर्षक चित्रे सादर केली.

इयत्ता ४ थी ते ७ वी गटातून प्रथम क्रमांक इहेम गीतेश खोब्रागडे, द्वितीय तीलक ओम मेश्राम तर तृतीय स्थान यश्मिता अमित भालेराव याने पटकाविले. इयत्ता ८वी ते १० वी गटातून प्रथम क्रमांक केतकी महेंद्र किणेकर हिने, द्वितीय क्रमांक स्वरा मिरे तर तृतीय क्रमांक जोशीता गोपाल साखरकर या विद्यार्थीनीने प्राप्त केले. प्रोत्साहनपर बक्षीसाच्या मानकऱ्यांमध्ये शरवरी संदीप गिरीपुंजे, राणू सुरेश मांढरे, हिरप्रिया संजय नारनवरे, श्रद्धा प्रकाश पाथोडे, परी टेलानि आदींचा समावेश होता. विजेत्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्रे व आकर्षक शालेय साहित्य भेट म्हणून देण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी फाउंडेशनच्या प्रियंका कोरे, पराग गुंडेवार, हुमेश अमृतकर, ऋत्विक मेश्राम, विपुल आंबोरकर, प्रांजली मुंगले, रितेश गोडे, तेजस सोनट्टक्के, भूषण नारनवरे, गुड्डु भोयर, राजू मिसार, विजय संदोकर इ. अथक परिश्रम घेतले.

## वैनगंगा विद्यालय, कोलारी येथे मोफत स्कुल बॅगचे वितरण



ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक १६/०७/२०२५ रोजी वैनगंगा विद्यालय कोलारी येथे स्व. अभिजित जगनाडे स्मृती प्रतिष्ठान ब्रम्हपुरी च्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग वितरीत करण्यात आल्या.

या प्रसंगी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ. देविदास जगनाडे सर बक्षीस वितरक व अध्यक्षस्थानी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हनूण आशिष जगनाडे व सुवर्णा जगनाडे उपस्थित होत्या. अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. जगनाडे सर यांनी ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक संकटामुळे शिक्षणापासून वंचित रहावा लागते. गरीबीमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणात अडचणी येऊ नये म्हणून हा उपक्रम आम्ही मागील ०८ वर्षापासून सुरु केला आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन नागपुरे सर यांनी तर आभार प्रदर्शन कोल्हे मॅडम यांनी केले. सफलतार्थ शाळेचे मुख्याध्यापक धनंजय दाते यांचेसह नागपुरे सर, कु. प्रधान मॅडम, अवसरे बाबू, सुरेश देशमुख, रुपलाल रामटेके यांनी परिश्रम घेतले.

नियमित वाचा... अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार

# आपत्ती व्यवस्थापन निधीअंतर्गत डोंगा देण्यात यावा

## रणमोचन येथील शेतकऱ्यांची मागणी

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यात मागील आठवड्याभरात भरपुर पाऊस पडला व अतिवृष्टी झाली. त्यामुळे वैनगंगा नदीला आलेल्या पुरात रणमोचन येथील शेतकऱ्यांचा डोंगा वाहून गेल्याने मोठे संकट ओढवले. सदर बाब आपत्ती व्यवस्थापन मार्फत येत असल्याने शासन स्तरावरून तहसीलदारांनी शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन डोंगा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत. या मागणी संदर्भात रणमोचन येथील शेतकऱ्यांनी ब्रह्मपुरीचे तहसीलदार सतीश मासाळ यांना निवेदन देऊन डोंगा उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे.

रणमोचन येथील शेतकऱ्यांची शेकडो हेक्टर शेती ही बोळेगाव शेत शिवारात आहे. बोळेगाव शेतशिवारात जाण्यासाठी भूती नाला ओलांडून जावे लागते. भुतिनाल्याला पावसाळ्यात पाणी राहत असल्यामुळे डोंग्याशिवाय पर्याय नाही. अगोदर हा डोंगा गावकऱ्यांकडे उपलब्ध होता. मात्र तो पुरात वाहून गेल्याने मोठी भीषण समस्या उद्भवली आहे. या मागणीकडे लक्ष वेधून आमची समस्या सोडवून द्यावी अशी मागणी रणमोचन येथील शेतकऱ्यांनी निवेदनातून केली आहे.

निवेदन देताना रणमोचन ग्रामपंचायत उपसरपंच सदाशिव ठाकरे, ग्रामपंचायत सदस्य संजय प्रधान, गोवर्धन दोनाडकर, विनोद दोनाडकर, वामन दर्वे, रमेश ढोरे, भाऊराव दोनाडकर, दादाजी मेश्राम, शंकर दोनाडकर, जनार्दन सहारे, शांताराम दोनाडकर यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

❁❁❁❁❁❁

# ख्रिस्तानंद विद्यालयात शालेय मंत्रीमंडळाची स्थापना



ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक ख्रिस्तानंद स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज ब्रम्हपुरी येथे नुकतेच शालेय मंत्रिमंडळाचे पदग्रहन सोहळा आयोजित करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणुन नगरपरीषद ब्रम्हपुरीच्या मुख्याधिकारी आर्शिया जुही तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिस्टर पावना, उपमुख्याध्यपिका सिस्टर अंजली, फादर क्रिस्टो प्रामुख्याने उपस्थित होते. विद्यालयात वर्षभरात विविध उपक्रम, स्पर्धा, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जात असतात त्यासाठी विविध समित्यांचे प्रमुख नियुक्त केले जातात. यावर्षी सुद्धा विविध समित्यांचे गठण करण्यात आले.

त्यामध्ये शाळा प्रमुख अजिंक्य आत्राम व रुतुजा राहाटे, शिस्तबद्धता प्रमुख प्रध्नेश मुनघाटे व याशिका मुलमुले, क्रिडा प्रमुख चिरायु दोनाडकर याची निवड करण्यात आली. तसेच रेड ग्रुप प्रमुख ओंकार दिघोरे व गित ठाकरे, येलो ग्रुप प्रमुख दिव्यम ठाकरे व नंदिनी गुरनुले, ग्रिन ग्रुप प्रमुख धवल राऊत व ग्रिसा शेंडे, ब्लु ग्रुप प्रमुख ईराजकुमार झाडे व आभा भागडकर, सांस्कृतिक प्रमुख गौरव तोंडरे व वेदिका रामटेके, भाषा प्रमुख अक्षांत मेश्राम व संम्सरा नगराळे, गणित प्रमुख अभिज्ञा टेंभुर्णे व वैष्णवी मुळनकर, विज्ञान प्रमुख प्रथमेश वानखेडे व श्रद्धा राठी, सामाजिक शास्त्र प्रमुख दिप पटेल व आफ्रिन शेख यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी न.प.च्या मुख्याधिकारी आर्शिया जुही यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच दहावी व बारावीच्या परीक्षेत प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते रोख, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह देवुन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांप्रति केंद्र व राज्य सरकार जागरूक व संवेदनशील

ब्रम्हपुरी/का.प्र.

शेतकऱ्यांसाठी नरेंद्र मोदी सरकारने मोठा निर्णय घेतला असून या योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. केंद्र सरकारने कृषी विकासाला चालना देण्यासाठी मोठ्या योजनांची घोषणा केली आहे.

यासंदर्भात मोदी सरकारच्या कॅबिनेट बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा पातळीवरील कृषी वाढ आणि प्रमुख सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक संस्थांना बळकट करण्यासाठी या योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. या योजनांवर एकूण वार्षिक खर्च पन्नास हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त अपेक्षित आहे. सरकारने सर्वांगीण कृषी विकासाला चालण्या देण्यासाठी 'पंतप्रधान धनधान्य कृषी योजना' सुरू केली आहे. या योजनेचा ३६ केंद्रीय क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणे हा आहे. या योजनेसाठी २४००० कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे. दरम्यान यापूर्वी देखील शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठा निर्णय घेतला आहे. काही दिवसांपूर्वीच राज्य सरकारने तुकडे बंदी कायदा रद्द करण्याची



घोषणा केली होती. या घोषणेमुळे छोट्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. छोट्या स्वरूपात आता शेतींचे व्यवहार करणे शक्य होणार आहे. शेतकऱ्यांप्रती केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार आणि राज्यातील फडणवीस शिंदे पवार सरकार शेतकऱ्यांप्रति निष्ठेने कार्य करीत आहेत, असे प्रतिपादन माजी आमदार प्रा.अतुल देशकर यांनी केले आहे.

❁❁❁❁❁❁

# नुरूल अन्सारी बहु. संस्थेचा 'ग्रीन ब्रम्हपुरी सिटी' बनविण्याचा संकल्प

ब्रह्मपुरी/का.प्र.

विकासाच्या नावाखाली शहरात सुरू असलेल्या बेकाबू वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. या पार्श्वभूमीवर नुरुल अन्सारी बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने 'ग्रीन ब्रह्मपुरी सिटी' हा संकल्प घेऊन वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश हरवलेली हरित संपदा पुन्हा बहाल करणे व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करणे हा आहे.

गेल्या काही दिवसांत ब्रह्मपुरीत झपाट्याने झाडांची कत्तल सुरू असून, त्यामुळे वातावरणावर व तापमानावर विपरित परिणाम होऊ लागला आहे. शहरातील हिरवळ नष्ट होण्याच्या पार्श्वभूमीवर नुरुल अन्सारी बहुउद्देशीय संस्थेने पुढाकार घेत झाडे लावण्याचे व हरित ब्रह्मपुरी पुन्हा घडवण्याचे ठरवले. त्याअनुषंगाने वृक्षारोपण मोहिम राबविण्यात आली. आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. शिशिर वंजारी, ज्येष्ठ हृदयतज्ज्ञ, आणि डॉ. अब्दुल रब शेख, शासकीय रुग्णालयाचे डॉक्टर यांनी भूषवले. यावेळी बंटी श्रीवास्तव यांनीही या उपक्रमात सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेहान पठाण यांनी केले. कार्यक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. शेवटी सर्व उपस्थित नागरिकांना झाडांचे संगोपन करण्याचे व त्यांच्या जीवंत राहण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन करण्यात आले.

# अनुष्का ठेंगरेला जागतिक स्ट्रेंथलिफ्टिंगमध्ये दोन सुवर्ण



ब्रम्हपुरी/का.प्र.

स्टेंथलिफ्टिंग स्पर्धेत भारतीय संघात निवड झालेली कु.अनुष्का अनंत ठेंगरे हिने थायलंड देशात झालेल्या जागतिक स्ट्रेंथलिफ्टिंग स्पर्धेत भारताला दोन गोल्ड मेडल मिळवून दिले आहेत.

स्ट्रेंथलिफ्टिंग स्पर्धेतील ज्युनिअर महिला गटात अनुष्का ठेंगरेही दोन गोल्ड मेडलची मानकरी ठरली आहे. अनुष्का अनंत ठेंगरे ही पांडुरंगजी पाटील ठेंगरे नागपूर (मूळ गाव- अऱ्हेरनवरगांव) यांची नात असून तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**... QUOTES ...**

**"I measure the progress of a community by the degree of progress which women have achieved."**

**- Dr. B.R. Ambedkar**

**चारोळी**

खाल्ल्या मिठाला नाही जागले
हरामखोर नमकहराम...
आधी मिठात होते भेसळ,
मग निष्ठा होते नमक हराम...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

नियमित वाचा.. अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये Hello Yellow Day Activity



ब्रम्हपुरी/का.प्र.

एल. एम. बी. पब्लिक स्कूल ब्रम्हपुरी येथे Hello Yellow Day Activity चे औचित्य साधून शनिवार, दि १९ जुलै २०२५ ला वरिल उपक्रम घेण्यात आला. या अंतर्गत विविध रंगाचे मुलानां ज्ञान मिळावे ह्यासाठी Hello Yellow Day Activity घेण्यात आली. या मध्ये पिवळा रंगाविषयी मुलांना विशेष माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांमधील विश्लेषणात्मक कौशल्यांना उत्तेजना मिळावी म्हणून नवनवीन उपक्रम शाळेद्वारे होत असतात. यावेळी पिवळ्या रंगाचे पोशाख विद्यार्थ्यांनी परिधान केले होते. तसेच पिवळ्या रंगामध्ये असलेल्या वस्तूची माहिती मुलांना देण्यात आली. यामध्ये पिवळया रंगाचे आंबे, केळी, फूले, फळे, पपई, फूलपाखरू आदी गोष्टी मुलांना दाखवण्यात आल्या व त्या विषयी इंग्रजी मध्ये माहिती देण्यात आली.

आयोजित उपक्रमाला नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव व शाळेचे अध्यक्ष अशोकजी भैया सर यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी अशोकजी भैया यांनी मुलांना मार्गदर्शन तसेच त्यांचे कौतूक केले. उपक्रमाच्या यशस्वीतेकरीता शाळेचे मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम तसेच प्री स्कुलच्या सर्व शिक्षिकांचे सहकार्य लाभले.

******

# ब्रम्हपुरी तालुका जिजाऊ ब्रिगेडची नवीन कार्यकारिणी गठित



ब्रम्हपुरी/का.प्र.

मराठा सेवा संघाच्या ३३ कक्षांपैकी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या जिजाऊ ब्रिगेड या महत्त्वाच्या कक्षाची महाराष्ट्रभर नव्याने बांधणी सुरू आहे. या उपक्रमाअंतर्गत ब्रम्हपुरी तालुक्यातील जिजाऊ ब्रिगेडच्या नव्या कार्यकारिणीची नुकतीच घोषणा करण्यात आली.

याप्रसंगी चंद्रपूर जिल्हा अध्यक्षा अर्चना चौधरी, जिल्हा उपाध्यक्ष दुर्गा आत्राम व जिल्हा सचिव परीतमा परकारे उपस्थित होत्या. यावेळी तालुकास्तरीय पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. ब्रम्हपुरी तालुका जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षपदी कल्पना तिवाडे, उपाध्यक्ष शुभांगी बेले, सचिव पिंकी राऊत तर सदस्य म्हणून जयश्री कुथे, राखी पिलारे, योगिता ठाकरे, विद्या ढोरे, ईशा पिलारे, पापिता कुथे, श्वेता पिलारे, योगिता बोकडे यांची नियुक्ती करण्यात आली.


या प्रसंगी जिल्हा अध्यक्षा अर्चना चौधरी मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, 'स्त्रियांच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी जिजाऊ ब्रिगेड कार्यरत असून, प्रत्येक महिलेला सन्मान मिळावा हीच आमची भूमिका आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालवयात राजमाता जिजाऊंनी दिलेले संस्कार हेच त्यांच्या दूरदृष्टीचे मोलाचे उदाहरण आहे. आजच्या काळातही महिलांनी जिजाऊ आणि सावित्रीबाई फुलेंचा आदर्श घेऊन स्वत:मध्ये आत्मबळ निर्माण करणे आवश्यक आहे.'

कार्यक्रमाचे संचालन ईशा पिलारे यांनी तर आभार प्रदर्शन कल्पना तिवाडे यांनी केले.

# निराधार महिलेचा अंत्यविधी, रेणुका माता वार्डातील जनतेची माणुसकी

ब्रम्हपुरी/का.प्र.

रेणुका माता चौकातील एका देशी दारू दुकाना जवळ बंद गाळ्याचा पायऱ्यावरच अंदाजे दहा ते बार वर्षपासून राहणाऱ्या महिलेची प्रकृती बिघडल्याने तिला उप जिल्हा रुग्णालय ब्रम्हपुरी येथे भरती करण्यात आले मात्र प्रकृती अधिक खालावल्याने दि. १६/०७/२०२५ ला सकाळी मरण पावली. निराधार महिलेचे कुणीही नातेवाईक उपस्थित नव्हते. वार्डातील नागरिकांनी माणुसकीचा नात्याने हिंदू रिवाजानुसार अंत्यविधीचा कार्यक्रम पार पाडला. तिच्या चौदावीचा कार्यक्रम २९ जुलै करण्यात येणार आहे.

Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर

मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स

प्रो.प्रा. सुरेश सोरते

मो. 8698323337

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट स्टिलचे नावे बनवून मिळेल.






# ने.हि. कन्या विद्यालयात ईव्हीएम...

(पान क्र. १ वरून)

लावून अभिनंदन करण्यात आले व मंत्रिमंडळाची स्थापना करून मंत्रीपदाची शपथ देण्यात आली.

प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिये दरम्यान नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया तसेच संस्थेचे सदस्य सुभाषजी बजाज यांनी ईव्हीएम मशिन ॲप निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण केले व स्वत: प्रात्यक्षिक करून प्रक्रिया समजून घेतली व या नवीन पद्धतीने आयोजन केल्याबद्दल शाळेचे भरभरून प्रशंसा व कौतुक केले.

निवडणूक प्रक्रिया उत्तमरीत्या पार पडण्यासाठी मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम, उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम यांनी मार्गदर्शन केले. निवडणूक प्रक्रियेचे उत्तमरीत्या आयोजन निवडणूक समिती प्रमुख धांडे मॅडम व भुंबर मॅडम यांनी त्यांच्या सहकारी शिक्षकांसोबत केले.

# मामाचा १४ वर्षीय भाचीवर...

(पान क्र. १ वरून)

पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४, ६४(२)(एफ), ६४(२)(एम), ६५ सहकलम ४,६,बालकाचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरिक्षक शितल पवन खोब्रागडे ह्या करीत आहेत.

# नोकरीचे आमिष देऊन आर्थिक...

(पान क्र. १ वरून)

नाकतोडे हिला मोठ्या शिताफिने मालडोंगरी रोड विदर्भ इस्टेट कॉलनी येथून दि.२१ जुलै २०२५ ला ५.५४ वाजता अटक केली. आरोपी रोषनी नाकतोडे हिने अटकपूर्व जामिनासाठी सत्र व उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला. परंतु तो जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला. आरोपी रोषनी हिचेवर लाखांदूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद असून तिने अटकपूर्व जामीन मिळविला आहे. पुढील तपास ब्रम्हपुरी पोलिस करीत आहेत.

पाणी अडवा, पाणी जिरवा...


Lubi PUMPS-MOTORS

बुधवार बंद

- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar

CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान

1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404